मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मराठा क्रांती मोर्चाचे आमरण उपोषण!

## शहरातील मराठा बांधवांनी उपोषणाला बसत मनोज जरांगे पाटील यांना दर्शविला पाठिंबा

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

मराठी आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील मराठा बांधवांनी उपोषणाला बसत पाठिंबा दर्शविला आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने जालना येथील अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी शांततेच्या व कायदेशीर मार्गाने आंदोलनाला बसलेल्या महिला भगिनी, लहान मुले व वयोवृद्धांवर जो अमानुषपणे लाठीचार्ज करण्यात आला.

याच्या निषेधार्थ पिंपरी चिंचवडसह महाराष्ट्रात सर्वत्र ठिकाणी निषेध करण्यात आला. मराठा समाजामध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आणि अनेक शहरांत बंद पुकारण्यात आला होता. असे असतांना देखील सरकारने अद्यापही मराठा समाजाच्या मागण्या मान्य करेपर्यंत आम्ही जाग्यावरून उठणार नाही असा पवित्रा मनोज जरांगे पाटील यांनी घेतला आहे. त्यांना पाठबळ मिळावे व त्यांना पाठींबा देण्यासाठी पिंपरी चिंचवड मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक छत्रपती शिवाजी महाराज, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांना निगडी येथील भक्ती शक्ती शिल्पास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिंपरी येथील स्मारकास पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून सतीश काळे व अनेक समन्वयक गुरुवार ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पिंपरी येथे उपोषणास बसले आहेत.

सतीश काळे यांना पाठिंबा देण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील मराठा क्रांती मोर्चाचे प्रकाश जाधव, लहू लांडगे, जीवन बोराडे, नकुल भोईर, अभिषेक म्हसे, सागर तापकीर, लक्ष्मण रानवडे, वैभव जाधव, सुनिता शिंदे, गोपाळ मोरे, रविशंकर उबाळे, सुनील शिंदे, लक्ष्मण पांचाळ, दिपक कांबळे, योगेश पाटील, निलेश शिंदे, स्वप्निल परांडे, प्रविण कदम, वचिष्ठ आवटे, वासुदेव काटे पाटिल, अमोल निकम यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपोषणास बसले आहेत. यावेळी उपोषण करत्याना पाठिंबा देण्यासाठी काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास कदम तसेच राष्ट्रवादीचे शहर कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे यांनी भेटून मराठा समाजाच्या मागण्यास पाठिंबा दिला आहे.



### डॉ. आंबेडकर चौकात उपोषण

**» पिंपरी चिंचवड मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक छत्रपती शिवाजी महाराज, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांना निगडी येथील भक्ती शक्ती शिल्पास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिंपरी येथील स्मारकास पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून सतीश काळे व अनेक समन्वयक गुरुवार ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पिंपरी येथे उपोषणास बसले आहेत.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये रविवारी १७ ठिकाणी वॉकेथॉनचे आयोजन

## ५ किलोमीटर चालण्याचा विश्वविक्रम होणार

**पिंपरी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

स्थूलत्व व मधुमेहमुक्त विश्व अभियानाचे प्रेरणास्थान डॉ.श्रीकांत जिचकार यांच्या जयंतीनिमित्त डॉ. जगन्नाथ दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवडमध्ये १७ ठिकाणी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती असोसिएशन फॉर डायबेटीस ॲन्ड ओबेसिटी रिव्हर्सल (अडोर ट्रस्ट) च्या विश्वस्त डॉ. वेदा नलावडे यांनी दिली. रविवारी दि.१० सप्टेंबर रोजी सकाळी ६ ते ९ या वेळेत जगभरातील विविध २५० ठिकाणी ५ किलोमीटर चालण्याचा विश्वविक्रम होणार आहे. या उपक्रमात हजारो लोक सहभागी होणार आहेत. या माध्यमातून डॉ. दीक्षित जीवनशैली पिंपरी-चिंचवडमधील जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहचवण्याचा उद्देश आहे असे अभियानाचे समन्वयक डॉ.संतोष ढुमणे, प्रा.दीपक येवले व प्रीतम वाघमैतर यांनी दिली. ज्यांना या पाच किलोमीटर चालण्याच्या उपक्रमात सहभाग घ्यायचा आहे त्यांनी विवेक कुलकर्णी यांना ९४२०१५४७४२ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन विश्वस्त डॉ.वेदा नलावडे यांनी केले आहे.




# ‘गोविंदाऽऽ रे गोपाळा’ ने परिसर दुमदुमला!

**पिंपरी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

गोविंदा ऽऽ रे गोपाळा... मच गया शोर सारी नगरी रे... यशोदेच्या तान्ह्या बाळा म्हणत थरावर थर रचणारी पथके, कानावर घुमणारा आवाज, डोळ्यांना खुणावणारी उंचावरील दहीहंडी आणि ती फोडण्यासाठी थर रचून लागलेली शर्यत... अशा आनंदात आणि उत्साहात शाळांमध्ये दहीकाला उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी बालगोपाळांनी दहीहंडी फोडण्याचा आनंद लुटला. चिंचवड स्टेशन येथील डॉल्फिन प्री-स्कूलमध्ये बालगोपाळांनी दहीहंडी साजरी केली. स्कूलच्या लहान मुलांनी श्रीकृष्ण आणि गोविंदाची तर मुलींनी राधेची वेशभूषा केली होती. मुलांनी मैय्या यशोदा, कृष्ण जन्मला गं बाई... गाण्यावर नृत्य सादर केले. संयोजन संस्थाचालक प्रा. कुमार गराडे, वैशाली गराडे यांनी केले. भोसरी येथील नारायण हट शिक्षण संस्थेच्या शाळेत बालचमूंची दहीहंडी उत्साहात साजरी केली. विद्यार्थ्यांना ‘गोपाळकाला’ श्रीकृष्णजन्म याविषयी मीनल पाटील, सायली संत यांनी महत्त्व सांगून माहिती दिली. शाळेच्या प्रांगणात सुंदर सजावट करून मुलांच्या वयोगटाचा विचार करून दहीहंडी उभारण्यात आली होती.

# जागोजागी खोदकाम, रस्त्यांवरील धूळीमुळे श्वसनाचे विकार वाढले!

## मोशीतील रस्त्यांवरील स्थिती, नागरिक त्रस्त

**मोशी। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** देहू-आळंदी रस्त्यावरील कामकाज अनेक महिन्यांपासून सुरु आहे. रस्त्याच्या रेंगाळलेल्या कामाचा परिणाम वाहनचालक आणि आजुबाजूच्या नागरिकांवर होत आहे. मणक्याचे आजार, श्वसनाचे आजार, वाहतूक कोंडी यामुळे मनस्ताप सहन करावा लागतो आहे. लवकरात-लवकर या रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी मागणी केली जात आहे. मात्र महापालिका प्रशासनाकडून धिम्म्या गतीने काम सुरु आहे. वाहनांच्या रहदारीमुळे परिसरातील घरे, दुकाने यामध्ये धुळधूळ जात आहे. रस्त्यांवरील खड्डे अर्धवट बुजवण्यात आलेले आहेत. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला खोदकाम केलेले असल्यामुळे वेगाने जाणाऱ्या जड वाहनांसोबत ही धूळ हवेत मिसळते आहे. धुळीमुळे वाहनचालकां सह परिसरात राहणारे नागरिक त्रस्त झाले असून, डोळे आणि श्वसनाच्या विकारात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डॉ. सुहास कांबळे म्हणाले, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहन चालकांना मणक्याचे हाडांचे आजार वाढण्याची भिती जास्त असते. सध्या मणक्याचे त्रास असलेल्या रूग्णांची संख्या अधिक प्रमाणात आहे.





**“महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून पाईपलाईन टाकण्याचे कामकाज सुरु आहे. जेवढे काम झाले,त्याठिकाणचे खड्डे बुजविण्यासाठी खडी आणि डांबर टाकण्यात आले आहे. त्यानंतरचे कामकाज स्थापत्य प्रकल्प विभागाकडे आहे.** **- डॉ. सुहास कांबळे**



**“देहू-आळंदी रस्त्यावर वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. तसेच अनेक दिवसांपासून महापालिकेकडून पाण्याच्या लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. खोदकाम केलेले रस्ते व्यवस्थित न बुजल्याने खडी, धूळ आणि खड्डे याचा परिणाम वाहनचालकांना आणि नागरिकांना श्वसन आणि मणक्याच्या त्रास होत आहेत. वाहतूक कोंडीने मोशीकर आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. लवकरात-लवकर या रस्त्याचे काम मार्गी लावावे.**

**-प्रा. कविता आल्हाट**

**(राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा - मोशी ग्रामस्थ) यांनी केली आहे.**

# पोलीस आयुक्तालयासाठी तिसऱ्या परिमंडळाची निर्मिती

## पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी आणखी एका परिमंडळ

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पोलीस आयुक्तालयाअंतर्गत गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी तसेच पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी आता आणखी एका परिमंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागाने आणखी एक परिमंडळ आणि चार अतिरिक्त विभागांना सोमवारी मान्यता दिली. त्यानुसार, परिमंडळ उपायुक्त तसेच विभागीय सहायक पोलीस आयुक्त यांच्या कार्यक्षेत्राची पुन:र्रचना निश्चित करण्यात आली असून परिमंडळ तीनच्या पोलीस उपायुक्तपदी संदीप डोईफोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरासाठी १५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर दोन परिमंडळ निर्माण करण्यात आले. सध्या उपायुक्त विवेक पाटील आणि डॉ. काकासाहेब डोळे यांच्याकडे परिमंडळ एक आणि दोनची जबाबदारी आहे. तर, स्वप्ना गोरे यांच्याकडे गुन्हे शाखेसह मुख्यालय, प्रशासनाची जबाबदारी आहे. संदीप डोईफोडे आणि शिवाजी पवार या दोघांची नव्याने पोलीस उपायुक्त म्हणून पिंपरी





चिंचवड शहरात १८ ऑगस्ट रोजी बदली झाली. मात्र, त्यांच्याकडे कोणताच पदभार देण्यात आला नव्हता. सन २०१८ मध्ये पिंपरी चिंचवड आयुक्तालयाची निर्मिती करताना शासनाने आयुक्तालयाकरीता दोन परिमंडळे आणि ४ विभागांना मान्यता दिली होती. परंतु, वाढती लोकसंख्या, नागरिकरण, औद्योगिकीकरण, शैक्षणिक संस्था, वाहतूक, वाहनांची वाढती संख्या तसेच कायदा – सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टिकोनातून पोलीस आयुक्तालयाची विभागवार पुनर्रचना होणे गरजेचे होते. ही गरज लक्षात घेऊन पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आणखी १ परिमंडळ व २ अतिरिक्त विभाग वाढवून मिळावा, यासाठी १७ मे २०२३ रोजी शासनास प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार, राज्याच्या गृह विभागाने ४ सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्तालयाकरीता आणखी एक परिमंडळ व चार अतिरिक्त विभागांना मान्यता दिली आहे. परिमंडळ उपायुक्त आणि विभागीय सहायक पोलीस आयुक्त यांच्या कायक्षेत्राची पुनर्रचना निश्चित करण्यात आली आहे. नवनिर्मित पोलीस उपायुक्त, परिमंडळ तीनकरिता कार्यालय भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या इमारतीमध्ये कार्यान्वीत करण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालयात नव्याने हजर झालेले संदीप डोईफोडे यांची परिमंडळ तीनच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वाहतुकीचे व्यवस्थापन व नियोजन याकरिता शिवाजी पवार यांची वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# सनसिटी-कर्वेनगर उड्डाणपुलाचे काम रखडले!

## सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी कायम

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्यावरील उड्डाणपुलाचे काम वेगाने सुरू झाले असतानाच सिंहगड रस्त्याला पर्यायी ठरणाऱ्या सनसिटी-कर्वेनगर नदीवरील उड्डाणपुलाचे काम रखडले असल्याचे स्पष्ट झाले आहे. सनसिटी-कर्वेनगर पुलासाठी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र, काम दिलेली कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने फेरनिविदा काढण्यात आली असून, निविदेला मंजुरी मिळाल्यानंतरही पुलाचे काम सुरू झाले नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीही कायम राहिली आहे. कोथरूड, कर्वेनगर आणि सिंहगड रस्ता दरम्यानच्या




**कंपनी दिवाळखोरीत गेल्याचे स्पष्ट**

» खासगी जागामालकांनीही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला होता. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिकेने कामाची निविदा प्रक्रिया राबविली होती. त्याला स्थायी समितीच्या ३ मे रोजीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर काम मिळालेली कंपनी दिवाळखोरीत गेल्याचे स्पष्ट झाल्याने महापालिका प्रशासनाकडून फेरनिविदा राबविण्यात आली. त्यानुसार विजय पटेल यांच्या कंपनीला उड्डाणपुलाचे काम देण्यात आले आहे.

राजाराम पुलावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून सिंहगड रस्ता सनसिटी येथून कर्वेनगरपर्यंत पूल प्रस्तावित आहे. महापालिकेच्या अंदाजपत्रकातही यासाठी तरतूद करण्यात आली आहे. उड्डाणपुलामुळे सिंहगड रस्ता आणि कर्वेनगर ही दोन उपनगरे काही मिनिटांत एकमेकांशी जोडली जाणार आहेत. या उड्डाणपुलासाठी महापालिकेने ३७ कोटींच्या खर्चाचा आराखडा केला असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल ते फनटाइम चित्रपटगृह या दरम्यान उड्डाणपुलाचे भूमिपूजन झाल्यानंतर सनसिटी-कर्वेनगर पुलासाठी आवश्यक भूसंपादनाची रखडलेली प्रक्रिया महापालिका प्रशानसाकडून सुरू करण्यात आली होती. खासगी जागामालकांनीही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला होता. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिकेने कामाची निविदा प्रक्रिया राबविली होती. त्याला स्थायी समितीच्या ३ मे रोजीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर काम मिळालेली कंपनी दिवाळखोरीत गेल्याचे स्पष्ट झाल्याने महापालिका प्रशासनाकडून फेरनिविदा राबविण्यात आली. त्यानुसार विजय पटेल यांच्या कंपनीला उड्डाणपुलाचे काम देण्यात आले आहे. मात्र अद्यापही काम सुरू झालेले नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीचा भार कायम राहिला असून, उड्डाणपुलाचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे. प्रस्तावित पुलामुळे सिंहगड रोड, कोथरूड आणि कर्वेनगरमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. काही दिवसांपूर्वी कोथरूडचे आमदार, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांची भेट घेतली होती. उड्डाणपुलाच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

# पहिल्या बीआरटी मार्गाचे अस्तित्व संपुष्टात?

## सोलापूर रस्ता रुंदीकरणासाठी महापालिकाच हातोडा घालणार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सोलापूर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मार्गातील अडथळे हटविण्यात येणार असून, त्यामध्ये अनावश्यक ठरणारा बीआरटी मार्गही काढण्यात येणार आहे. तसेच पदपथांची रुंदी कमी करण्यात येणार असून, काही ठिकाणचे सायकल मार्गही काढले जाणार आहेत. त्यामुळे सोलापूर रस्त्यावरील बीआरटी मार्ग काढण्याची परंपरा कायम राहिली असून, बीआरटी मार्गाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावर वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. पंधरा वर्षांपूर्वी सोलापूर रस्त्यावर प्रायोगिक तत्त्वावर बीआरटी मार्ग करण्यात आला. कात्रज ते हडपसर या मार्गासाठी महापालिकेने १०० कोटी रुपयांचा खर्च केला.



> **अडथळे हटविल्यानंतर सोलापूर रस्त्यावर चार मार्गिका उपलब्ध होणार आहेत. सध्या केवळ दोन मार्गिका आहेत. सेवा रस्ते आणि पदपथांवर अतिक्रमण होत असल्याने ती काढून रस्ता मोकळा करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. सर्व विभागांच्या सहमतीनंतरच या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल.**
>
> **– व्ही. जी. कुलकर्णी,**
> **मुख्य अभियंता, पथ विभाग**

मात्र, बीआरटी मार्गामुळेच वाहतूककोंडीत भर पडत असल्याने या बीआरटी मार्गाला सर्वपक्षीय विरोध सुरू झाला आणि बीआरटी मार्गाचे अस्तित्व संपुष्टात येण्यास सुरुवात झाली. त्यात आता रस्ता वाहतुकीसाठी प्रशस्त करण्याच्या निमित्ताने महापालिका प्रशासनाकडूनही बीआरटी मार्गाचा काही भाग काढण्यात येणार आहे. भैरोबा नाला चौक ते आकाशवाणी या दरम्यानचा रस्ता पहिल्या टप्प्यात प्रशस्त केला जाणार आहे. त्यामुळे रस्त्यातील अतिक्रमणे दूर करण्यासंदर्भात महापालिका, पीएमपी, प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक पोलीस यांच्यात गेल्या आठवड्यात बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये वाहतूककोंडी दूर करण्यासंदर्भात आणि रस्त्यावरील सर्व प्रकारचे अडथळे दूर करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यानुसार ही कार्यवाही महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. रस्ते प्रशस्त करण्यासंदर्भातील अडथळे दूर केल्यानंतर चार मार्गिका उपलब्ध होणार आहेत, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. या अंतरातील अनावश्यक ठरणारा बीआरटी मार्ग काढला जाणार आहे. तसेच पदपथांची आणि सेवा रस्त्यांची रुंदी कमी केली जाणार आहे. पदपथालगतचे सायकल मार्गही हटविण्यात येणार आहेत. बीआरटी थांबेही रस्त्याच्या कडेला बसविले जाणार आहेत. भैरोबा नाला चौक ते आकाशवाणी हा रस्ता सध्या ४५ मीटर रुंदीचा आहे. मात्र, त्यामध्ये दहा मीटर रुंदीचा बीआरटी मार्ग असून, दोन्ही बाजूला प्रत्येकी चार मीटर रुंदीचे पदपथ आणि सायकल मार्ग आहेत. काही ठिकाणी साडेसात मीटर रुंदीचे सेवा रस्ते ठेवण्यात आले आहेत. या अडथळ्यांमुळे आणि दुभाजक, तसेच अन्य अतिक्रमणामुळे सुमारे २४ मीटर रुंदीच्या रस्त्याचा वापर होत नाही. काही ठिकाणी सलग बीआरटी मार्ग नाही. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

# अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना आणखी एका संधी!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून 'कॅरी ऑन' लागू करण्याचा निर्णय

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना कॅरी ऑनची संधी देण्याच्या मागणीसाठी विविध विद्यार्थी संघटनांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंदोलन केले होते. विद्यापीठाने त्यावर निर्णय घेत विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविज्ञान आणि आंतरविद्याशाखीय या अभ्यासक्रमाच्या सर्वच प्रथम आणि द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षेची एक संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसह अन्य विद्याशाखांतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना लॉटरी लागली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना संधी देण्यासाठी




घेतलेल्या कॅरी ऑनच्या निर्णयाच्या धर्तीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानेही अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना कॅरी ऑनची संधी देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यासाठी एनएसयूआयसह विविध विद्यार्थी संघटनांनी आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या बैठकीत चर्चा करून उन्हाळी सत्र २०२३ परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये विशेष प्रवेश संधी देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्रासाठी किंवा जेथे लागू असेल तेथे द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षाच्या सहाव्या सत्राला तात्पुरता प्रवेश काही अटींच्या अधीन दिला जाणार आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून हमीपत्र लिहून घेणे अनिवार्य असेल. तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्रामध्ये किंवा चौथ्या वर्षाच्या सातव्या सत्रामध्ये तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी त्यात अध्ययन, प्रात्यक्षिके, सत्रकर्म, क्षेत्रभेट आणि इतर बाबी महाविद्यालयाने नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पूर्ण करून घेणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर परीक्षा आणि इतर बाबी या हिवाळी २०२३ (ऑक्टोबर) परीक्षेमध्ये अनुशेषाने विषय पूर्णतः उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी प्रचलित तृतीय-चौथ्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्र ठरतील, अशाच विद्यार्थ्यांना पुढील सत्रासाठी प्रवेश सुरू ठेवता येईल. तर, पाचव्या-सहाव्या, सातव्या-आठव्या सत्र समाप्तीच्या लेखी परीक्षा संबंधित विद्यार्थ्यांना एकत्रित अर्थात उन्हाळी २०२४ च्या परीक्षांमध्ये देता येतील. विशेष परीक्षेची संधी घेऊन तात्पुरत्या स्वरूपात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम द्वितीय आणि तृतीय वर्षाचे अनुशेष पूर्ण न केल्यास प्रचलित नियमानुसार तृतीय आणि चौथ्या वर्षाच्या पाचव्या सातव्या सत्राला संबंधित विद्यार्थी अपात्र ठरतील. संबंधित विद्यार्थ्यांचा तात्पुरता प्रवेश आपोआप रद्द होऊन विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे जमा केलेले शैक्षणिक शुल्क आणि इतर बाबी यांचा परतावा लागू राहणार नसल्याचे परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

### सातव्या सत्रामध्ये तात्पुरता प्रवेश

**» तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्रामध्ये किंवा चौथ्या वर्षाच्या सातव्या सत्रामध्ये तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी त्यात अध्ययन, प्रात्यक्षिके, सत्रकर्म, क्षेत्रभेट आणि इतर बाबी महाविद्यालयाने नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पूर्ण करून घेणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर परीक्षा आणि इतर बाबी या हिवाळी २०२३ (ऑक्टोबर) परीक्षेमध्ये अनुशेषाने विषय पूर्णतः उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी प्रचलित तृतीय-चौथ्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्र ठरतील, अशाच विद्यार्थ्यांना पुढील सत्रासाठी प्रवेश सुरू ठेवता येईल.**

# पुण्यात जोरदार पावसाची शक्यता

## घाटमाथ्यावर मुसळधारेचा इशारा



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरासह संपूर्ण जिल्ह्यातच दिवसभर ढगाळ हवामान आणि दुपारनंतर बहुतेक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याच काळात जिल्ह्यातील घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. गुरूवारी सकाळपासूनच पुणे शहरासह जिल्ह्यात ढगाळ हवामान होते. तुरळक ठिकाणी अति हलक्या ते हलक्या स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली होती. सध्या पुण्यासह संपूर्ण राज्यातच मॉन्सून पुन्हा सक्रीय झाला असून, पुढील दोन दिवसांत त्याची तिव्रता वाढण्याची शक्यता आहे. सध्या बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र निवळल्यानंतर ओडिशा आणि छत्तीसगड परिसरावर समुद्र सपाटीपासून ७.६ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. ही प्रणाली मध्य प्रदेशाकडे सरकण्याची शक्यता आहे. मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा सर्वसाधारण स्थितीच्या दक्षिणेकडे आला असून, जैसलमेर, उदयपूर, इंदोर, बेतूल, गोंदिया, रायपूर, गोपालपूर ते पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे.

महाराष्ट्राच्या मध्य भागात पूर्व-पश्चिम वाऱ्यांचे जोडक्षेत्र तयार झाले आहे. त्यामुळे राज्यातही शुक्रवारी (ता.८) कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भातील अनेक जिल्ह्यांत जोरदार पावसाचा इशारा आहे. मराठवाडा, आणि विदर्भातील काही जिल्ह्यांत विजांसह पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

### संपूर्ण राज्यातच मॉन्सून सक्रीय

**» गुरूवारी सकाळपासूनच पुणे शहरासह जिल्ह्यात ढगाळ हवामान होते. तुरळक ठिकाणी अति हलक्या ते हलक्या स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली होती. सध्या पुण्यासह संपूर्ण राज्यातच मॉन्सून पुन्हा सक्रीय झाला असून, पुढील दोन दिवसांत त्याची तिव्रता वाढण्याची शक्यता आहे.**

# शेअर मार्केटमुळे तरुणाची आत्महत्या

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अनेक वेळा कमी वेळेत जास्त पैसे कमावण्याच्या हव्यासापोटी अनेकांना लाखो रुपयांचा फटका बसतो. यातूनच अनेक तरुण टोकाचे पाऊल उचलतात. अशीच एक घटना पुण्यातील देहूगाव माळवाडी या ठिकाणी घडली आहे. शेअर मार्केटमध्ये आर्थिक फटका बसल्याने नितीन चंद्रभान परदेशी वय- २४ वर्ष या तरुणाने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली आहे. नितीनने आत्महत्या करण्यापूर्वी सुसाईड नोट लिहून ठेवली असून त्यात त्याने शेअर मार्केटमध्ये आर्थिक नुकसान झाल्याने आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आत्महत्या केलेला नितीन चंद्रभान परदेशी हा त्याचा भाऊ आणि वहिनीसह देहुगाव येथील माळवाडी या ठिकाणी राहत होता. तो काम (उद्योग, नोकरी) करत नव्हता. नितीन सतत शेअर मार्केटमध्ये गुंतलेला असायचा अशी माहिती देहू पोलिसांनी दिली आहे. तर, नितीन चा भाऊ हा नोकरी करतो. नितीन ची वहिनी नुकत्याच गावी गेल्या असून नितीन आणि त्याचाच भाऊ राहत होते.

बुधवारी नेहमीप्रमाणे नितीन चा भाऊ नोकरीवर गेला तेव्हा नितीन ने राहत्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली. नितीनने आत्महत्येपूर्वी सुसाईड नोट लिहिली असून त्यात शेअर मार्केटमध्ये मोठा आर्थिक नुकसान झाल्याने आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. अशी माहिती देहू पोलिसांनी दिली आहे. परदेशी कुटुंब हे वैजापूर, जिल्हा संभाजीनगर या ठिकाणच आहे.